प्राचार्य व विभाग प्रमुख, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ यांच्या बदली बाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक : बदली-४३१९/प्र.क्र. ८७/१९/तांशि-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१९

शासन आदेश :

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या सेवेतील खाली नमुद प्राचार्य व विभाग प्रमुख, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था यांची स्तंभ-४ नुसार बदलीने पदस्थापना करण्यात येत आहेत.

अ.क्र.	शासकीय अधिका-याचे नाव	कार्यरत संस्था	बदलीनंतरची पदस्थापना	अभिप्राय
१	२	३	४	५
प्राचार्य				
१	श्री.अतुल बोरडे	शा.तं.नि. विक्रमगड	शा.तं.नि. गडचिरोली	विनंती बदली
२	श्री. नितीन सोनजे	शा.तं.नि. गडचिरोली	शा.तं.नि.मिरज	विनंती बदली
विभाग प्रमुख, यंत्र अभियांत्रिकी				
३	श्री. अजय किसनराव वाघमारे	शा.तं.नि. मुर्तीजापूर	शा.तं.नि. बीड	विनंती बदली
४	श्री. एन.जे.शिरभाते	शा.तं.नि.जालना	शा.तं.नि. अमरावती	विनंती बदली
५	श्री. धिरेंद्र शामराव ढोबळे	शा.तं.नि. गडचिरोली	शा.तं.नि. मुर्तीजापूर	विनंती बदली
विभाग प्रमुख, अणुविद्युत अभियांत्रिकी				
६	श्री. विजयकुमार मानकर	शा.तं.नि. अहमदनगर	शा.तं.नि. नागपूर	विनंती बदली
७	श्री. दत्ता गर्गे	शा.तं.नि. अमरावती	शा.तं.नि. कोल्हापूर	विनंती बदली
विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी				
८	श्री. दत्तात्रय महाजन	शा.तं.नि. मालवण	शा.तं.नि. ठाणे	विनंती बदली
९	श्री.विजय कोंडेकर	शा.तं.नि.पेण	शा.तं.नि.साकोली	विनंती बदली
विभाग प्रमुख उपयोजित यंत्रशास्त्र				
१०	श्री योगेश कांतिलाल चंदाराणा	शा.तं.नि.जालना	शा.तं.नि.नागपूर	विनंती बदली
विभाग प्रमुख, संगणक अभियांत्रिकी				
११	श्रीम. ज्योती रामराव हंगे	शा.नि.म.तं.नि. लातूर	शा.तं.नि. अवसरी	विनंती बदली

०२. संबंधितांची विनंती बदली असल्याने त्यांना पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

०३. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) सादर आदेश तात्काळ अंमलात येतील.

२) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्राचार्य व विभाग प्रमुखांनी सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतून तात्काळ त्यांची बदली नंतरची पदस्थापना केलेल्या संस्थेत रुजू व्हावे. तसेच संस्थाप्रमुखांनी पर्यायी प्राचार्य व विभाग प्रमुख हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या प्राचार्य व विभाग प्रमुखास तात्काळ कार्यमुक्त करावे.

३) बदली झालेले प्राचार्य व विभाग प्रमुख त्यांच्या संबंधित संस्थेकडून कार्यमुक्त होऊन रुजु होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखाद्या प्राचार्य किंवा विभाग प्रमुखास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरुन काम न करता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येईल.

४) बदली झालेल्या प्राचार्य किंवा विभाग प्रमुखांची कोणतीही रजा प्रशासकीय विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय मंजूर करण्यात येऊ नये.

५) बदली झालेल्या प्राचार्य व विभाग प्रमुखांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची जबाबदारी वैयक्तीकरित्या संबंधित संस्था प्रमुखांची राहील. प्राचार्य यांनी संबंधितांना कार्यमुक्त न केल्यास त्यांचेविरूध्द, संचालक, तंत्रशिक्षण यांनी वेळीच प्रशासकीय कारवाई सुरू करावी व आवश्यकतेनुसार प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा. तसेच याबाबत कार्यपालन अहवाल या आदेशाच्या दिनांकापासून ०८ दिवसात संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांनी न चुकता या विभागास सादर करावा.

०४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१९१४१०५९४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Jaya Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd7816002b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2019.09.19 15:55:52 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित प्राचार्य व विभाग प्रमुख, (प्राचार्य, संबंधित संस्था यांचेमार्फत)

प्रत :

१) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

२) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

३) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

४) सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

५) उप सचिव (तंशि) उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

६) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

७) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती (तंत्रशिक्षण संचालनालय यांचेमार्फत),

८) प्राचार्य, संबंधित शासकीय तंत्रनिकेतने (तंत्रशिक्षण संचालनालय यांचेमार्फत),

९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर,

१०) सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (तंत्रशिक्षण संचालनालय यांचेमार्फत),

११) निवड नस्ती (तांशि-७).